# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला

वाचाः शासन निर्णय वित्त विभाग क्रमांकः रानियो-२०२२/प्र.क्र.-३४/सेवा-४, दि. ३१.०३.२०२३

## परिपत्रक

क्र.बीजीए/पेन्शन/०७/२०२३./1235 दिनांकः- ०१ ऑगस्ट, २०२३.

सर्व नियंत्रण अधिकारी/कार्यालय प्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी यांना कळविण्यात येते की, त्यांचे आस्थापनेवरील परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत कर्मचाऱ्याचा सेवा कालावधीत मृत्यु झाल्यास त्याच्या कुटुंबियांना कुंटुंबनिवृत्तीवेतन आणि मृत्यु-उपदान तसेच रूग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याला रूग्णता निवृत्तीवेतन आणि सेवानिवृत्ती-उपदान तसेच शासन सेवेतुन निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवा-उपदान मंजुर करण्याबाबत उपरोक्त शासन निर्णयानुसार प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

त्यानुसार शासननिर्णयातील मार्गदर्शक सुचनेप्रमाणे जे अधिकारी/कर्मचारी दि. १.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर शासन सेवेत नियुक्त झालेले असुन सद्यस्थितीत त्यांना परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली लागु आहे अशा कर्मचाऱ्यांचा सेवेत असतांना मृत्यु झाल्यास त्याच्या कुटुंबाला म.ना.से (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील तरतुदीप्रमाणे कुटुंबनिवृत्तीवेतन आणि मृत्यु-उपदान तसेच रूग्णतानिवृत्तीवेतन लागु करण्यात आलेले आहे. तसेच विद्यापीठ सेवेतुन निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवा-उपदान अनुज्ञेय आहे.

तेव्हा शासन निर्णयात नमुद केल्यानुसार परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत मृत पावलेल्या कर्मचाऱ्यांना कुटुंबनिवृत्तीवेतन आणि मृत्यु-उपदान तसेच सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना सेवा-उपदान प्रदान करण्याबाबतची कार्यवाही आपले स्तरावरून करून प्रस्ताव मुळसेवापुस्तकासह द्विप्रतित या कार्यालयास सादर करावा.

सदर परिपत्रक विद्यापीठाचे अर्थ प्रशासन विभाग, यांचे सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

मा. कुलगुरू यांचे मंजुरी व आदेशान्वये.

स्वाक्षरीत/-
कुलसचिव
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

**प्रतः- माहिती व योग्य कार्यवाहीकरिता रवाना.**

१) नियंत्रक, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला.

२) नियंत्रक अधिकारी,(सर्व)------------------------------------------------------------------------

३) कार्यालय प्रमुख सर्व ------------------------------------------------------------------------

४) अधिदान व लेखाधिकारी, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला/नागपूर.

५) प्रभारी अधिकारी, संगणक विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.

उपकुलसचिव(आस्था)
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.